


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : १९१ वा बुधवार दि २४ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# दोस्तीत कुस्ती! कोकणात शिवसेनेच्या मतदारसंघांवर भाजपचा डोळा? आणखी एका मतदारसंघात डाव टाकला....

**वृत्तसंस्था/ रत्नागिरी**

कोकणात शिवसेनेच्या मतदारसंघात भाजपने विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने स्वबळाची तयारी सुरू केली असून शिवसेनेसमोर प्रत्येक मतदारसंघात मोहरा उतरण्यासाठी भाजप प्रयत्नशील आहे. कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण मतदारसंघात प्रशांत यादव यांच्या भाजप पक्ष प्रवेशानंतर आता दापोली मतदारसंघात वैभव खेडेकर यांना पक्षप्रवेश देऊन शिवसेनेसमोर आव्हान निर्माण करण्याची तयारी भाजपने केली आहे. तसे स्पष्ट संकेत भाजपच्या पक्षश्रेष्ठींकडून देण्यात आले आहेत. भाजपचे मंत्री व रत्नागिरी जिल्ह्यातील सहसंपर्क मंत्री नितेश राणे यांच्याकडूनही तसेच स्पष्ट संकेत देण्यात आले आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हकालपट्टी केलेले वैभव खेडेकर यांचा आता भाजप प्रवेश झाला असून केवळ औपचारिकता बाकी आहे. रत्नागिरी जिल्ह्यात गेली काही वर्षे शिवसेनेची एकहाती सत्ता आहे. राज्यातील मोठ्या राजकीय भूकंपानंतरही रत्नागिरी जिल्ह्यात शिंदेंच्या शिवसेनेचाच वरचष्मा राहिला आहे. याच पार्श्वभूमीवर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लक्षात घेऊन भाजपने प्रत्येक मतदारसंघावर लक्ष केंद्रित केले असून पुढील विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीनेही भाजपने जोरदार रणनीती आखली आहे. महायुतीत चिपळूण मतदारसंघ हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडे आहे. त्या ठिकाणी शेखर निकम हे विद्यमान आमदार असून त्यांची ही दुसरी टर्म आहे. या मतदारसंघावर आमदार शेखर निकम यांचं वर्चस्व आहे. मात्र पुढील विधानसभा निवडणुकीत चिपळूण मतदारसंघात भाजपचा आमदार असेल, असा दावा नितेश राणे यांनी प्रशांत यादव यांच्या पक्षप्रवेशावेळी केला होता. आता पुन्हा एकदा रत्नागिरी जिल्ह्यात दापोली मतदारसंघात याचीच पुनरावृत्ती होऊ घातली आहे. या मतदारसंघावर शिवसेनेचा पगडा आहे. २०१४ ते २०१९ या कालावधीतील तत्कालीन राष्ट्रवादीत असलेले माजी आमदार संजय कदम यांचा अपवाद सोडता या गेल्या ३० वर्षात मतदारसंघात शिवसेनेची सत्ता राहिली आहे. माजी आमदार संजय कदम हेही आता रामदास कदम यांच्याबरोबर शिवसेनेत आहेत. त्यामुळे या मतदारसंघात आता राजकीय विरोधकांची अवस्था फारशी चांगली नाही. या मतदारसंघात रामदास कदम यांचे पुत्र गृहराज्यमंत्री योगेश कदम हे विद्यमान आमदार आहेत. या मतदारसंघावरती शिवसेनेचे युवा नेतृत्व असलेल्या योगेश कदम एक हाती वर्चस्व आहे. या मतदारसंघात गेल्या काही वर्षात आजवर भाजपची परिस्थिती फारशी समाधानकारक राहिलेली नाही. वैभव खेडेकर एकेकाळी रामदास कदम यांचे निकटवर्ती मानले जात होते. मात्र त्यांनी मनसेमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांच्यामध्ये राजकीय कटूता आली. मात्र पुन्हा गेले काही वर्ष ही कटूता कमी होताना दिसली. मनसेमध्ये असताना वैभव खेडेकर





यांनी रामदास कदम यांच्याशी पंगा घेतल्यानंतर खेड नगरपरिषदेत राज्यातील पहिली मनसेची एकहाती वैभव खेडेकर यांनीच आणली होती. चळवळीतला थेट भिडणारा कार्यकर्ता अशी त्यांची ओळख आहे. मात्र दोन महिन्यांपूर्वी वैभव खेडेकर यांच्यासह रायगड आणि रत्नागिरीतील काही पदाधिकाऱ्यांची मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षातून हकालपट्टी केली. हीच संधी साधून वैभव खडेकर व मनसेतून बडतर्फ केलेल्या पदाधिकाऱ्यांना भाजपने त रेड कार्पेट घातले आहे. त्यामुळे दापोली-खेड-मंडणगड विधानसभा मतदारसंघात भाजपला वैभव खेडेकर यांच्यासारखा तगडा चेहरा मिळाला आहे. त्यांच्या पक्षप्रवेशासाठी भाजपचे युवा नेते मंत्री नितेश राणे यांनी प्रयत्न केले. इतकंच नाही तर त्यांनी गणेशोत्सवात थेट खेड येथे येऊन भेटही घेतली. आज हा पक्षप्रवेश मुंबईत झाला असून कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील प्रत्येक मतदारसंघात भाजपची पुढील चार वर्षांनी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी अशीच रणनीती असल्याची चर्चा आहे.

# प्रेयसीवर हल्ला, नंतर स्वत:वर वार दोघांचाही घटनास्थळीच मृत्यू!

## चिखली बायपासवरील हॉटेलात रंगला हत्येचा थरार...

**जनसंचलन/ खामगाव**

चिखली बायपासवरील जुगनू हॉटेलात मंगळवारी रात्री धक्कादायक घटना घडली. चारित्र्याच्या संशयावरून प्रियकराने प्रेयसीची हत्या करून स्वतःलाही भोसकून केल्याची आत्महत्या माहिती पोलिस तपासातून पुढे आली आहे. या घटनेत दोघांचाही घटनास्थळी मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास उजेडात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतांमध्ये २१ वर्षीय युवती व सोनू उर्फ साहिल राजपूत (२३, दोघेही रा. साखरखेर्डा) यांचा समावेश आहे. काही दिवसांपासून या दोघांमध्ये वाद सुरू होता. त्यातूनच साहिलने हॉटेलात युवतीवर धारदार शस्त्राने हल्ला करून तिचा खून केला. त्यानंतर स्वतःवर वार करत त्याने जीवनयात्रा संपवली. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली. हत्येची बातमी वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळी नागरिकांची गर्दी झाली होती. पोलिसांना परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी बळाचा वापर केला



# घटस्थापनेचा घटमुहूर्त

## संपादकीय लेख

देशातील करपद्धतीत मूलभूत बदल करणारी वस्तू व सेवा कर (जीएसटी) प्रणाली सन २०१७मध्ये अमलात आली. करांचे चार टप्पे व कागदपत्रांच्या सादरीकरणातील कमालीची क्लिष्टता हे त्यात जन्मजात असे प्रमुख दोष होते. त्यामुळे या दोषांच्या निवारणाची विनंती/ मागणी विविध घटक तेव्हापासूनच करीत होते. अखेर त्या दोषांचे निवारण करून नव्या सुधारित स्वरूपातील जीएसटी प्रणाली लागू झाली आहे. जीएसटीमधील घट लागू करण्यासाठी नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवसाचा, घटस्थापनेचा मुहूर्त मोदी सरकारने निवडला. नव्या जीएसटी रचनेमुळे विविध खाद्यपदार्थांपासून ते आरोग्य-जीवन विम्यापर्यंत अनेक गोष्टींसाठी आधीच्या तुलनेत कमी पैसे मोजावे लागणार असल्याने सामान्य नागरिकांत दिलाशाचे वातावरण आहे, ते अगदी स्वाभाविक म्हणायला हवे. वस्तूंच्या किमती घटल्याने त्याचा खप व पर्यायाने उत्पादन वाढते आणि एकंदरच अर्थचक्रास गती मिळते, हा बाळबोध नियम. आत्ता सुरू असलेला नवरात्रोत्सव आणि येऊ घातलेली दिवाळी अशा पार्श्वभूमीवर अर्थचक्रास गती मिळणे सामान्यांच्या व देशाच्याही लाभाचे. जीएसटीतील कपातीमुळे होणारी स्वस्ताई सामान्यांपर्यंत पोचवणे ही आता उत्पादकांची जबाबदारी आहे. त्याचवेळी, हा निर्णय होण्याआधी कच्चा माल खरेदी केला अधिक दराने व त्यातून निर्माण झालेला पक्का माल आता विकावा लागणार कमी दराने, असा मुद्दा सोमवारी मोठ्या प्रमाणात उत्पादकांकडून मांडला गेला. यावरून अद्याप असलेला गोंधळ तातडीने दूर करणे ही आता सरकारची जबाबदारी आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आततायी निर्णयांमुळे जागतिक अर्थव्यवस्थेत अस्थिरता आहे. त्यांच्या आयातशुल्क निर्णयाचा मोठा फटका भारतालाही बसू शकतो. त्या फटक्याची तीव्रता कमी करण्याचे काम जीएसटी कपातीचा निर्णय करू शकतो, असे तज्ज्ञ मानतात. या सगळ्यांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वदेशीचा धरलेला आग्रह महत्त्वाचा मानायला हवा. पण असा आग्रह हा केवळ भावनिक आवाहनांपुरता उरता कामा नये. सरकारला मनापासून वाटत असेल तर,




आजच्या जागतिकीकरणाच्या काळातही स्वदेशीची अंमलबजावणी देशासाठी व देशवासीयांसाठी कशी व्यवहार्य व फायदेशीर ठरू शकते, हे सरकारने पटवून द्यावे लागेल. त्याच्या अंमलबजावणीसाठी ठोस अशी काही रचना उभारावी लागेल. त्यात सातत्य राखावे लागेल. अर्थकारण हे भावनांच्या हिंदोळ्यावर चालत नाही. तेथे रोकडे सत्यच लागते, हे सरकार जाणत असणारच, ही अपेक्षा.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# पुरूषहो, तुमच्या या सवयींवर महिला होतात पार घायाळ

## इम्प्रेस करण्यासाठी डोळे झाकून करा ही कामं, उडेल लग्नाचा बार

मानवी नातेसंबंध हे अतिशय नाजूक आणि गुंतागुंतीचे असतात. कोणत्याही नात्यामध्ये आदर, समजूत, संयम आणि प्रामाणिकपणा हे घटक आवश्यक असतात. स्त्रियांना एखाद्या पुरुषामध्ये काय भावते, हे सांगणं तितकंच कठीण आहे, पण चाणक्य नीतीत याचे स्पष्ट उल्लेख सापडतात. चाणक्य हे केवळ राजकारणाचे जाणकार नव्हते, तर मानवी स्वभावाचे अचूक अभ्यासकही होते. त्यांनी आपल्या नीतीशास्त्रात स्त्रियांना प्रभावीत करणाऱ्या पुरुषांच्या पाच गुणांचा उल्लेख एका श्लोकात केला आहे. हा श्लोक आहे ङ्गयथा चतुर्भिः कनकं परीक्ष्यते, निघृष्णच्छेदनतपद्रैः तथा चतुर्भिः पुरुषः परीक्ष्यते, श्रुतेन शीलेन गुणेन कर्मणा।फ या श्लोकानुसार, स्त्रिया केवळ दिसण्यावर नव्हे, तर पुरुषांच्या विचार, वागणूक, प्रामाणिकता आणि नात्यातील समजुतीवर भाळतात. पुरुषाची ही काही सवयी स्त्रियांच्या




दृष्टीने त्याला ङ्गहिरोफ बनवतात, आणि त्याच्याशी नातं जोडणं हे त्यांच्या दृष्टीने सन्मानास्पद ठरतं. कोणत्याही नात्याची खरी ताकद ही विश्वासात असते, आणि तो निर्माण होतो तो प्रामाणिकपणामुळे. चाणक्य स्पष्टपणे सांगतात की, स्त्रियांना अशा पुरुषांबद्धक प्रेम वाटतं जे नात्यामध्ये पूर्णपणे इमानदार असतात. अशा पुरुषांमध्ये काहीही लपवाछपवी नसते, आणि ते आपली चूकही मान्य करतात. महिलांना सहसा पुरुषांवर शंका घ्यायची सवय असते, पण जेव्हा पुरुष मनापासून प्रामाणिक असतो, तेव्हा त्या त्याच्या प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवतात. त्यामुळे इमानदारी ही फक्त सवय नाही, तर एक नातं टिकवून ठेवणारी अमूल्य शक्ती आहेसज्जनपणा आणि सौम्यता हे पुरुषांमधील असे गुण आहेत जे कोणत्याही स्त्रीला आकर्षित करतात. चांगली वागणूक म्हणजे केवळ बोलण्याच्या स्वरात नम्रता असणे नव्हे, तर समोरच्याच्या भावनांची जाणीव ठेवणे. जो पुरुष स्त्रीशी तसेच इतर लोकांशी आदराने बोलतो, त्यांच्या मतांना किंमत देतो, तो स्त्रियांना आपला वाटतो.

उलट टोमणे मारणारे, सतत कुरकुर करणारे पुरुष त्यांना मानसिक थकवा देतात. स्त्रीला फक्त एक गोष्ट हवी असते आपुलकीने वागणारा जोडीदार.अनेक पुरुष बोलण्यात पटाईत असतात, पण ऐकणं फारच थोड्यांना जमतं. चाणक्य सांगतात की, चांगला श्रोता असलेला पुरुष हा स्त्रीच्या मनाजवळचा होतो. स्त्रियांना त्यांच्या मनातलं बोलायचं असतं अगदी छोट्या छोट्या गोष्टींसकट. त्या वाट पाहत असतात की कोणी तरी त्यांच्या भावना नजरेआड न करता शांतपणे ऐकावं. जेव्हा एखादा पुरुष तिचं म्हणणं ऐकतो, तिच्या भावनांना महत्त्व देतो आणि वेळोवेळी तिचं कौतुक करतो, तेव्हा ती त्याला आपल्या आयुष्यातील ङ्गखास व्यक्तीफ मानते.चाणक्य नीतीमध्ये एक स्पष्ट संदेश आहे जो पुरुष स्त्रीच्या आत्मसन्मानाची जपणूक करतो, त्याचा ती खऱ्या अर्थानं आदर देते. नात्यांमध्ये थट्टा, उपहास, लहान-मोठं बोलणं हे हळूहळू नातं तुटण्याची कारणं ठरतात. स्त्रीचं मन अतिशय नाजूक असतं जिथे तिला अपमानाची छाया सुद्धा जाणवते, तिथे ती मागे हटते. म्हणूनच, जो पुरुष तिच्या मतांचा आदर करतो, तिला स्वतंत्र निर्णय घेऊ देतो आणि तिच्या मर्यादा समजून घेतो, तोच तिच्या आयुष्यात टिकतो.चाणक्य म्हणतात की, जो पुरुष आपल्या चुका सहजपणे स्वीकारतो, त्याचा अहंकार त्याच्या प्रेमाच्या आड येत नाही. स्त्रियांना अशा पुरुषांची किंमत वाटते, जे आपलं म्हणणं थोपवून न धरता, आवश्यक तेव्हा माफी मागण्याची किमान नम्रता ठेवतात. गर्विष्ठपणा, वर्चस्व गाजवण्याची सवय आणि ङ्गनेहमी आपणच बरोबरफ असा दृष्टिकोन नात्याला मारक ठरतो. जो पुरुष संवादाच्या माध्यमातून गैरसमज दूर करतो आणि मनमोकळेपणाने नातं सांभाळतो, त्यालाच स्त्री आपल्या जीवनाचा खरा साथीदार मानते.

# सख्ख्या बहिणी झाल्या पक्क्या वैरी! श्रीदेवींसोबत बहीण सावलीसारखी असायची; कशामुळे बिघडलं नातं?

**मुंबई -** ज्येष्ठ अभिनेत्री श्रीदेवी या बॉलिवूड आणि टॉलिवूड इंडस्ट्रीमध्ये काम करणाऱ्या आणि इतर देशांच्या चाहत्यांकडून प्रेम मिळवणाऱ्या सर्वात लोकप्रिय कलाकारांपैकी एक होत्या. त्यांनी त्यांच्या चित्रपट कारकिर्दीत ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलं आणि यश मिळवलं. पण त्या त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत राहिल्या. आज आपण श्रीदेवी आणि त्यांच्या बहिणीच्या नात्याबद्दल जाणून घेणार आहोत. एकेकाळी श्रीदेवी आणि त्यांची बहीण एकमेकींची सावली होत्या. पण नंतर असं काही घडलं की, ज्यामुळे त्यांच्यात दुरावा निर्माण झाला.सुपरस्टार श्रीदेवी यांच्या बहिणीचं नाव श्रीलता आहे. १९७० मध्ये जेव्हा अभिनेत्रीने तिच्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली तेव्हा श्रीलता तिच्यासोबत सेटवर जायची. नंतर, ती पुरस्कार समारंभ आणि इतर कार्यक्रमांमध्ये देखील दिसली. ज्यावरून असं दिसून आलं की, अभिनेत्री कधीही एकटी नव्हती. श्रीलतालाही चित्रपटसृष्टीत प्रवेश करायचा होता असं म्हटलं जातं. पण काही कारणांमुळे तिचं स्वप्न कधीच पूर्ण झालं नाही आणि ती तिच्या बहिणीची मॅनेजर बनली.मातृभूमी पोर्टलनुसार, बहिणींमधील दुरावा सर्वांनाच आश्चर्यचकित करणारा होता. असं म्हटलं जातं की, त्यांच्या आईच्या मृत्यूनंतर दोन्ही बहिणी वेगळ्या झाल्या. १९९६ मध्ये जेव्हा त्यांच्या आईला रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं, तेव्हा डॉक्टरांच्या चुकीमुळे तिचं ऑपरेशन चुकीचं झालं. त्यामुळे तिची स्मरणशक्ती कमकुवत झाली आणि शेवटी तिचा मृत्यू झाला. त्यानंतर श्रीदेवी यांनी रागाच्या भरात चुकीचं ऑपरेशन केल्याबद्दल रुग्णालयाविरुद्ध खटला दाखल केला. रिपोर्टनुसार, त्यांनी खटला जिंकला आणि भरपाई म्हणून मिळालेले ७.२ कोटी रुपयेही त्यांनी स्वतःकडे ठेवलेयाशिवाय, श्रीदेवी यांनी त्यांच्या आईची मालमत्ताही स्वतःच्या नावावर केली होती, ज्यामुळे त्यांची बहीण श्रीलता नाराज झाली. मालमत्तेत आपला वाटा मिळवण्यासाठी तिने अभिनेत्रीविरुद्ध खटला दाखल केला होता आणि दावा केला की, त्यांची आई मालमत्ता हस्तांतरण कागदपत्रांवर सही करण्यासाठी मानसिकदृष्ट्या ठीक नव्हती. श्रीलताला तिच्या वाट्याचे २ कोटी रुपये मिळाले. त्यामुळे नात्यात कटुता आणखी वाढली.बोनी कपूर यांनी दोन्ही बहिणींमध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला पण ते कठीण होतं. २०१३ मध्ये जेव्हा श्रीदेवी यांना पद्मश्री मिळाला तेव्हा त्यांच्या बहिणीने कुटुंबातील सदस्यांसह आनंद साजरा केला. मग असं म्हटलं गेलं की त्यांच्यात सगळं ठीक आहे. पण, जेव्हा श्रीदेवी यांचं निधन झालं तेव्हा श्रीलता चेन्नईतील प्रार्थना सभेला उपस्थित



राहिली नाही. सध्या, श्रीलता तिचे पती सतीश यांच्यासोबत चेन्नईमध्ये राहते. त्यांच्या लग्नाला ज्येष्ठ अभिनेते ऋषी कपूर देखील उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



### बुलढाणा येथे ११ऑक्टोबर ऐवजी २२ नोव्हेंबर२०२५ ला जागतिक धम्म परिषदेचे आयोजन

# मूकनायक फाउंडेशन द्वारा विविध क्षेत्रातील मान्यवरांचा होणार सन्मान

जनसंचलन/बुलढाणा



बुलढाणा जिल्ह्यामध्ये होत असलेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे धम्म बांधवांची गैरसोय टाळण्यासाठी ही जागतिक धम्म परिषद ११ ऑक्टोंबर ऐवजी २२ नोव्हेंबर २०२५ ला बुलढाणा येथे होत आहे.विविध देशातील नावलौकिक असलेल्या भिकू संघाच्या उपस्थितीमध्ये बुलढाणा येथे मूकनायक फाउंडेशन द्वारा येत्या ११ ऑक्टोबर ऐवजी २२ नोव्हेंबर २०२५ रोजी जागतिक धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या धम्म परिषदेला भारत ,चीन, जपान, थायलंड, श्रीलंका, मलेशिया, सह इतर बौद्ध देशातील भिकू देखील उपस्थित राहणार आहेत. या धम्म परिषदेमध्ये विविध क्षेत्रातील नावलौकिक असलेल्या व्यक्तिमत्त्वांचा मूकनायक फाउंडेशन द्वारा प्रतिष्ठेचा समजला जाणारा❈मूकनायक पुरस्कार❈ देऊन गौरव देखील करण्यात येणार आहे. त्यासाठी कला, वैद्यकीय, संरक्षण, विधी ,शिक्षण ,तंत्रज्ञान,उद्योग, समाजकार्य, साहित्य व प्रशासन इत्यादी क्षेत्रातील दखलपात्र कामगिरी करणाऱ्या मान्यवरांनी आपल्या कार्याचा अहवाल दोन प्रती मध्ये पाठविण्याचे आवाहन मूकनायक फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सतीश पवार यांनी केले आहे. पुरस्कारासाठी अहवाल पाठविण्याची मुदत पुढील १० ऑक्टोंबर पर्यंत असून दोन प्रती मध्ये पाठवणे बंधनकारक असणार आहे. या सोबतच समाजातील उद्योजकांना चालना देण्यासाठी व नवउद्योजक होऊ इच्छिणाऱ्या तरुणांसाठी बिझनेस एक्सपोचे देखील आयोजन करण्यात आलेले आहे. या एक्सपो मध्ये देखील उद्योजक महिला बचत गट व इच्छुक तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे याचे देखील आवाहन मूकनायक फाउंडेशनचे अध्यक्ष सतीश पवार यांनी केले आहे. गेल्या वर्षी मूकनायक फाउंडेशन द्वारा आयोजित जागतिक धम्म परिषदेला विविध स्तरातून बौद्ध धम्म बांधवांचा उत्स्फूर्त व प्रचंड प्रतिसाद लाभला होता. बुलढाणा जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील बौद्ध अनुयायांची उपस्थिती देखील दखलपात्र होती. चक्रवर्ती सम्राट महान राजा अशोक यांच्या पाऊलखुणांनी पवित्र झालेल्या ऐतिहासिक अशा बुलढाणा जिल्ह्यामध्ये जागतिक धम्म परिषदेचे आयोजन हे बौद्ध धर्म अनुयायांसाठी एक पर्वणी ठरणार आहे.

## अतिवृष्टी सदृश पाडळी, मढ, गिरडा भागात भाजपा पदाधिकारी पोहचले नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर...

जनसंचलन/बुलढाणा



बुलढाणा तालुक्यातील मढ, गिरडा, पाडळी, पळसखेड नाईक यासह संपूर्ण तालुक्यात आज सकाळपासून जोरदार पावसाने हजेरी लावली. यामुळे ऐन हातातोंडाशी आलेले शेतीमाल उध्वस्त होत आहे. आज सकाळी पाडळी भागात अतिवृष्टीग्रस्त भागाला भेट देऊन त्या ठिकाणी संबंधित शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी सोयाबीन व इतर पिकांचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे दिसून आले. यावेळी तालुकाध्यक्ष सतिश भाकरे पाटील यांनी बुलढाणा तहसीलदार कुंमरे साहेबांना भ्रमणध्वनी वरून झालेल्या नुकसानीची माहिती देऊन आपण या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतावर येऊन तत्काळ पंचनामे करावेत व अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळवून द्यावी अशी विनंती केली. यावेळी बुलडाणा जिल्हा जिल्हाध्यक्ष योगेश राजपूत, भाजपा युवा नेते गणेश फेपाळे, सरचिटणीस प्रवीण गाडेकर, सतिष पाटील नरवाडे, माजी सरपंच रवींद्र पवार, अनंता डुकरे, संजय जुंबड यांच्यासह परिसरातील नुकसानग्रस्त शेतकरीउपस्थितहोते.

# पुणे पोलीस उपायुक्त यांची विशेष उपस्थिती...

## माणस फाउंडेशनच्या दुर्गा उत्सवात सर्व मान विधवांना!

## समाजातील कर्तुत्वान महिलांचा सन्मान

जनसंचलन/बुलढाणा



स्रीशक्तीचे प्रतीक असणाऱ्या दुर्गा देवीची स्थापना मानस फाउंडेशनने काल उत्साहात केली. शिवसाई ज्ञानपीठ समोर विधवांच्या हस्ते देवीची मूर्ती बसवण्यात आली. पूजा आरच्या व सर्व विधी विधवांनीच पार पाडले.शिवाय नऊ दिवस सर्व सोहळा विधवांच्याच हस्ते पार पडणार आहे. या सामाजिक कार्यक्रमास उपस्थिती दर्शवून विधवा भगिनींचे मनोबल वाढविण्यासाठी पुणे पोलीस उपायुक्त यांची विशेष उपस्थिती देखील लाभणार आहे. दुर्गादेवीच्या कार्यक्रमात विधवा विवाह सोहळा आयोजित करून मानस फाऊंडेशनने आपल्या सामाजिक कक्षेची देखील जाणीवही करून दिली आहे. बुलढाण्यात मानस फाउंडेशनच्या वतीने विधवा महिलांसाठी कार्य सुरू आहे. फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा डी एस लहाने यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहे. दुर्गा उत्सवामध्ये पूजा आर्चा मान व देवी स्थापनेची सुरुवात विधवा भगिनी पासून करण्याचा मनोदय त्यांनी काही दिवसापूर्वी व्यक्त केला होता. मानस फाउंडेशनने आयोजित केलेल्या मिटिंग मध्ये याला संमती दर्शविली. त्यानुसार दुर्गादेवीची स्थापना विधवा भगिनींच्या हस्ते शिवसाई ज्ञानपीठ समोर २२ तारखेला करण्यात आली. दुर्गा स्री शक्तीचे प्रतीक आहे. घरातील दुर्गा अर्थात आपली भगिनी उपेक्षित जीवन जगत असेल तर नुसते उत्सव करण्यापेक्षा कृतिशील पाऊल टाकलेले केव्हाही चांगले असे प्राध्यापक लहाने यावेळी म्हणाले. या भूमिकेतून आम्ही नऊ दिवस विविध सामाजिक उपक्रम आयोजित केले आहे. या उपक्रमातून विधवा महिलांना सन्मानाची वागणूक मिळावी, त्यांना व त्यांच्या मुलांना समाजाने सन्मानाने स्वीकारावे, यासाठी ही चळवळ राबविल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. नऊ दिवस मानस फाउंडेशनने विविध कार्यक्रम आयोजित केले आहे. त्यामध्ये समाजामध्ये विशेष कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान फाउंडेशन करणार आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये महिला योगदान देतात परंतु बऱ्याच वेळा त्याची दखल घेतल्या जात नाही, अशा कर्तुत्वान महिलांना हेरून त्यांचा सन्मान केला जाणार आहे. पारंपारिक धारणेनुसार ,परंपरेनुसार विधवा महिला पुन्हा विवाह करत नाही. बऱ्याच समाजामध्ये हे पाळले जाते. मात्र पारंपारिक रूढी परंपरांना झुगारून ज्या महिलांनी पुनर्विवाह केला व सुखाने जीवन जगत आहेत अशा महिलांचा सन्मान देखील केल्या जाणार आहे. दुर्गा उत्सव म्हटला की गरबा आलाच,त्यानुसार दररोज रात्री मनोरंजनासाठी गरब्याचे आयोजन देखील आहे.वेगवेगळे विषय देऊन शालेय विद्यार्थ्यांना लिहिण्यास प्रवृत्त करणे, वाचण्यास प्रवृत्त करणे या उद्देशाने निबंध स्पर्धेचे आयोजनही आहे. विजेत्यांना यथोचित विविध बक्षीस देखील दिली जाणार आहे. शैक्षणिक क्षेत्रामध्ये महिलांनी आपला दमदार ठसा उमटविला आहे. विविध क्षेत्रांमध्ये प्रशासकीय पातळीवर त्या कार्यरत आहे. पुणे पोलीस उपायुक्त श्वेता खेळकर यांनीही मानस फाउंडेशनच्या कार्यामध्ये सहभागी होण्यास सहमती दर्शवली आहे. त्या २७ तारखेला होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी आहे. श्वेता केळकर ह्या पूर्वी बुलढाणा येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत होत्या. तर बक्षीस वितरण सोहळा डीवायएसपी बुलढाणा गायकवाड साहेब यांच्या हस्ते होत आहे. या कार्यक्रमासाठी मानस फाउंडेशनचे गणेश निकम केळवदकर, प्राचार्य शाहीनाताई पठाण ,मनीषा वारे, प्रतिभा भुतेकर, सुरेखा सावळे, प्रज्ञा लांजेवार,प्रा. ज्योती पाटील, अनिता कापरे ,ऍडव्होकेट संदीप जाधव, गजानन मुळे, पंजाबराव गवई ,शिवाजी शिंदे व शिवशाही परिवाराचे सदस्य मेहनत घेत आहे.

## बुलडाणा ग्रामीण भाजपाचे निरक्षर व अशिक्षित जेष्ठ नागरिकांना राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र मिळण्यासाठी येणाऱ्या समस्या सोडविण्याबाबत तहसीलदारांना निवेदन...

जनसंचलन/बुलडाणा

सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आम्ही सर्व बुलढाणा तालुका भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते आपणास सविनय विनंती करीत आहोत की निरक्षर व अशिक्षित जेष्ठ नागरिकांना ज्यांचे जन्म १९६० ते १९८० या दरम्यान झाले आहेत अशा सर्वांना आपापल्या विविध प्रशासकीय कामांसाठी राष्ट्रीयत्व प्रमाणपत्राची गरज पडत असून त्यासाठी त्यांच्याकडे त्यांच्या जन्म स्थळाचा पुरावा असणे आवश्यक आहे. परंतु त्यातील अनेक ज्येष्ठ नागरिक निरक्षर व अशिक्षित असल्याने त्यांच्याकडे शाळा सोडण्याचा पुरावाच नसणे किंवा शाळा सोडण्याच्या दाखल्यावर किंवा जन्म दाखल्यावर जन्मस्थळाची नोंद नसल्यामुळे त्यांना राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र मिळण्यासाठी मोठी अडचण ठरत आहे. अशा व्यक्तींना राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र मिळवण्यात अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. आमच्या माहितीप्रमाणे इतर तालुक्यात ज्या नागरिकांना अशी अडचण येत आहे त्यांचे कडून प्रतिज्ञापत्र स्वीकारून त्यांना राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र देण्यात येत आहे अशाच प्रकारची



योग्य कार्यवाही आपल्याही बुलढाणा तालुक्यात होणे अपेक्षित आहे. तरी आपण आपल्या स्थरावून सदर ज्येष्ठ नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने योग्य ती कारवाई करावी ही नम्र विनंती!

बुलढाणा तालुका भाजपा तर्फे सदर निवेदन देऊन तहसीलदारांना ही समस्या सोडविण्याची विनंती करण्यात आली आहे.

# सोहळ्यात मी नाहले




आमच्या घराशेजारच्यांनी मला बोलावल्याचा निरोप आला. म्हणून मी गेले त्यांच्या वरच्या हॉलमध्ये मला त्या घेऊन गेल्या आणि मला काही बोलताच येईना, तुम्ही जरा जाऊन हॉल उघडा, मी सामान घेऊन येते म्हटल्याने मी कडी काढली आणि थक्कच झाले.


माझा मुलगा सून, नातू, भावंडे असे सगळे जवळचे नातलग आत होते. हॉल पूर्ण सजवला होता. समोरच्याच भिंतीवर माझ नाव आणि फुलांनी ६१चा अंक तयार केला होता. सारं मला सुखद धक्का देणार आणि सर्वांच्या चेह-यावरचा आनंद सारं काही मला मी स्वप्नात नाहीना, असं विचार करायला लावणारं होतं. मी खरंच खूप भारावून गेले. सवकष आनंदाचा हा माझ्या आयुष्यातील पहिलाच भारावलेला प्रसंग.

मी प्रवेश करताच सर्वांनी टाळ्या वाजवल्या आपली आश्चर्याचा धक्का देण्याची कल्पना पार पडली. याचा आनंद माझ्या माणसांना झालेला तर सर्व जाणिवा गोठून गेलेली मी. मी आले तोवर माझ्या पाठोपाठ सर्वांमध्ये सामील असूनही घरातून मी येईपर्यंत निर्विकार राहिलेले माझे पती आले. सर्वांनी माझं औक्षण केलं सारे काही आनंदाचे सोहळे पार पडले.

माझा साठ वर्षाचा जीवनप्रवास हे सर्व आज आठवताना क्षणक्षण आठवतो आहे. एका खेडेगावात माझा जन्म अत्यंत गरीब घरात झाला. माझ्या आत्याला मूल नव्हतं. ती मला मी खूप बाळ असताना घेऊन गेली. मला तीच माझी आई माहीत झालेली. त्यामुळे ती माझी आई अशीच बाकीची नाती होत गेली. मी माध्यमिक शाळेत जाण्याच्या सुमारास माझी आई गेली. तोपर्यंत मला एक भाऊ झाला होता, तो खूप लहान होता. वडिलांची अत्यंत दुर्गम ठिकाणी शिक्षकाची नोकरी होती, त्याठिकाणी ते आम्हाला दोघांना घेऊन राहू शकत नव्हते आणि आम्ही दोघांनी राहण्याचा तो काळ आणि तशी परिस्थिती नसल्याने आम्हाला एका मावशीकडे रहावं लागलं. मी एसएससीची परीक्षा दिली आणि माझं लग्न झालं. मी मोठ्या शहरात राहायला आले. शहर मोठं आणि ज्या घरात आले तेही कुटुंब मोठं, त्यामुळे ठिकाण आणि घर तेथील माणसं सा-यांनीच मी भांबावले होते. परिस्थितीने आणि आलेल्या प्रसंगातून मी तोंड बंद ठेवून कसं राहायचं शिकले होते. पडेल किंवा कोणी सांगेल ते मी काम करत राहिले. व्यवहार, चाली-रीती सर्व काही शिकण्याचं आणि घरातील माणसांची मर्जी सांभाळणे हा माझा अभ्यासक्रम खूप वर्ष राहिला. मला आता कधी मागे वळून आयुष्याकडे पाहताना आणि आत्ताच्या मुलामुलींचे संसार पाहताना मनात येतं, माझं लग्न लवकर झालं आणि मला माझी अशी स्वत:ची मतं काहीच पुसटशीसुद्धा नसल्याने, मी त्या-त्या वेळी कोणी सांगेल ते शिकत गेल्याने आयुष्य शिकले. घरकामाबरोबर उरलेल्या वेळात काम म्हणून आणि संसाराला हातभार म्हणून मी भरतकाम करून देण्याचा पर्याय निवडला आणि कामाला लागले. पोस्टाची आरडी जमा करण्याचं काम स्वीकारलं. माझ्यासाठी मी दुचाकी शिकून घेतली. या सगळ्यासाठी मला माझ्या पतीने मोलाची साथ दिली आणि त्यामुळेच मला माझं जीवन घडवता आलं. नाहीतर मी शिक्षण, आर्थिक, सामाजिक सर्वच बाबतीत मागास होते. माझ्या लग्नानंतर मी माझ्या भावाला, वडिलांना माझ्या नवीन कुटुंबात सामावून घेऊ शकले. माझ्या सर्व एकत्रित असलेल्या कुटुंबाची मी कायम मनातून ऋणी राहिले. जे काम करायचं ते मनापासून, श्रमाने आणि निरपेक्षपणे या भावनांचं माझ्या आयुष्यात भांडवल खूपच फायदेशीर राहील. मला दोन मुलगे झाले. आता मी स्वतंत्र संसार सुरू केला. आत्तापर्यंत आमचं म्हणून एक घरकुल तयार झालं होतं. मुलगेही छान शिकले आणि आर्थिकदृष्ट्या रांगेला लागले. मोठा मुलगा परदेशी गेला आता तो सहकुटुंब तेथे राहतो. त्याने घरात मात्र संपर्क अजिबात कमी केला नाही. दोनही सुना माझ्या मुली म्हणून राहतात. माझ्या मोठ्या सुनेला अत्यंत गरज असल्याने, काही कारणांनी मला ऑस्ट्रेलियाला एकटीने जावं लागलं आणि मनात भीती ठेवून का असेना, तिची गरज म्हणून मी तिथे जाऊन पोहोचले सुद्धा. मला आता कधीच एकटेपणा जाणवत नाही, लहानपणापासून मी एकटी असणारी आता माझं कुटुंब माझ्यासकट नऊजणांचं झालं आहे. माझ्यासाठी ते नवरसांच परिपूर्ण रसात्मक आहे. हे पूर्णत्व मला लाभलं यातच मी खूश आहे. मी शहरात राहिल्याने माझ्या नात्याने संबंधित जे नातेवाईक शिक्षण, नोकरी संदर्भात आले त्यांना या शहरात रुजण्यासाठी आवश्यक ती मदत करण्यासाठी माझ्या पूर्ण कुटुंबाने सहकार्य केलं. त्यामुळे इथे रुजलेल्या नातलगांना माझं घर आधारघर राहील. देवाच्या दयेने आणि घरातील सर्वांच्या परोपकारी स्वभावाने मला कोणालाही आवश्यक ती मदत करता आली. अगदी कोणी माझ्या कोकणातून आरोग्याची दोरी बळकट करण्यासाठी उपचारासाठी हॉस्पिटलला आले असतील, तरीही त्यांच्यासाठी लागणारी सोय करणे हे प्रत्येकाने मुख्यत: माझ्या पतीने त्याची जबाबदारी स्वीकारून ते काम आपलसं केलं.

आज मला आर्थिक स्थिरता तर आली आहेच. माझ्या जन्माने मी कोणीच नसलेल्या आणि सुरुवातीची काही वर्ष खडतर गेलेल्या मला काहीच अपेक्षा आणि काहीच ध्येय न नेमून दिल्याने परमेश्वराने मला जे आज दिलं आहे, मी जी काही आज आहे तो माझा मला स्वर्ग वाटत आहे. आज माझ्या साठ वर्ष पूर्ण होणा-या आयुष्याकडून मला सर्व काही मिळालं आहे. नातं हे जन्मानं काय, यापेक्षा आपल्या जीवनात कसे जगतो, किती प्रेमाने जगतो, तशी नाती तयार होऊन ती आपल्याबरोबर जगतात. आपल्याला आनंद आजच्यासारखा देण्याला झटतात आणि कमकुवत वेळेला आधार द्यायला बरोबर असतात. हे जीवनातलं सत्य जगून पटलं आहे. मी आज माझ्या आयुष्याकडून माझ्या माणसांकडून पूर्ण समाधानी आहे. आज सर्वांनी माझ्या साजरा करत असलेल्या सोहळ्यात मी अक्षरश: न्हाऊन निघाले आहे.

# ऑस्ट्रियामध्ये स्पंज सिटी तयार होत आहे



जगभरातील शहरांनी हवामान बदलाचे धोके ओळखले आहेत आणि त्यांचा सामना करण्यासाठी उपाययोजनांवर काम करत आहेत. कारण बहुतांश शहरे हवामानाचा प्रकोप सहन करण्यासाठी तयार केलेली नाहीत. कॉंक्रीटपासून बनवलेल्या इमारती केवळ उष्णतेची लाट वाढवतात. याशिवाय पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही, अशा पद्धतीने या इमारती आणि शहरे बांधण्यात आली आहेत.या चुकीचा परिणाम म्हणून गेल्या काही महिन्यांत युरोपातील काही देशांना विनाशकारी वादळे आणि पुराचा सामना करावा लागला आहे.अशा आपत्ती टाळण्यासाठी ऑस्ट्रियामध्ये असे शहर तयार केले जात आहे, जे महापूआणि हवामानाची तीव्रता सहन करण्यास सक्षम असेल. व्हिएन्नाच्या शेजारी असलेल्या ॲमसीबोजेनमध्ये बनवलेल्या या स्पंज सिटीफ्तील झाडं पाहून वाटतं की ती एखाद्या योद्ध्यासारखी शहरे जमिनीत सतत पाणी वाहत राहण्यासाठी गुरुत्वाकर्षणाच्या श्नतीचा वापर करतील.

जेणेकरून हे पाणी तलावात साठवता येईल.सोप्या भाषेत सांगायचे तर, ही स्पंज शहरे ही नैसर्गिक जलचक्राची प्रतिकृती बनवतील.

ऑस्ट्रेलियाच्या युनिव्हर्सिटी ऑफ ॲडलेड लॅंडस्केप आर्किटेक्चर ॲंड अर्बन डिझाईन प्रोग्रामचे संचालक स्कॉट हॉकेन याबाबत म्हणतात की, ही संकल्पना पाण्याशी हुशारीने काम करण्याची आहे, जेणेकरून पूर कमी धोकादायक होईल. गेल्या दशकभरात स्पंज सिटीचे अनेक घटक जगभरातील मेट्रो शहरांमध्ये समाविष्ट केले गेले आहेत. चीनने २०१३ मध्ये कोंजियन यांची कल्पना स्वीकारली. तेथे ३० शहरांमध्ये या संकल्पनेची चाचणी करण्यात यश आले आहे. त्यामुळे सन २०३० पर्यंत ८० टक्के शहरी भाग या चौकटीत साचेबद्ध करण्याचे नियोजन आहे. कोपनहेगन येथील वेस्टरब्रोच्या एका उद्यानात पृष्ठभागाच्या खाली तलावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी साठवले गेले आहे.

# आता पत्रकारांचेही चलो मुंबई

## पत्रकार संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील पत्रकार संघटनांचा चलो मुंबईचा नारा

जनसंचलन/मुंबई

राज्यातील पत्रकारांवरील वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारकडून पत्रकार संरक्षण कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीस राज्य सरकारला भाग पाडण्याकरिता राज्यातील पत्रकार संघटनांनी आज चलो मुंबईचा नारा दिला आहे. विविध पत्रकार संघटनांनी एकत्र येत तयार केलेल्या पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंच च्या मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. नाशिक, त्र्यंबकेश्वर, मुंबई, अमरावती आदि ठिकाणी पत्रकारांवरील भ्याड हल्ल्याचा या बैठकीत तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न वारंवार उद्भवत असून, या संदर्भात राज्य सरकारने २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या पत्रकार संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नोटीफिकेशन तातडीने काढावे, असा ठराव या बैठकीत संमत करण्यात आला. सरकारने याची तातडीने अंमलबजावणी न केल्यास टप्प्या टप्पयानं आंदोलनाची धार वाढवत नेण्याचा निर्णय घेण्यात आला.. त्यानुसार येत्या ११ ऑक्टोबरपासून यासाठी राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात येणार असून ११ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री आणि दोन्ही मुख्यमंत्र्यांना हजारो एस.एम. एस पाठवून त्यांचे लक्ष पत्रकारांच्या मागण्यांकडे वेधले जाईल.. त्यानंतर २५ नोव्हेंबर रोजी आझाद मैदानावर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येईल.. त्यामध्ये महाराष्ट्रातील किमान ५००० पत्रकार सहभागी होतील.. त्यासाठी ङ्गचलो मुंबईफ्चा नारा या बैठकीत देण्यात आला आहे. या बैठकीस अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के, विश्वस्त राही भिडे, परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, राजा अदाटे , शरद पाबळे, परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टिवकर, ज्येष्ठ संपादक महेश म्हात्रे, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे सुजित महामुलकर, मुंबई क्राइम रिपोर्टर असोसिएशनचे विशाल सिंह, डिजिटल मिडिया परिषदेचे गणेश जगताप, युवराज जगताप, सुनील ह. विश्वकर्मा, अजय मगरे, जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्राचे राजेंद्र साळसकर आदि पत्रकार उपस्थित होते. सरकारला जाग आणण्यासाठी येत्या ११ ऑक्टोबरपासून राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा निर्णय घेण्यात आला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे




आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना राज्यभरातून पत्रकार लाखोंच्या संख्येने एसएमएस पाठवून पत्रकार संरक्षण कायद्याची अंमलबजावणी करावी, अशी विनंती करणार आहेत. त्यानंतरही सरकारचे डोळे उघडले नाहीत, तर संविधान दिनाचे औचित्य साधून आझाद मैदान येथे एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करणार आहेत आणि यासाठी राज्यभरातील पत्रकार मुंबईत धडकतील, असा निर्णय यावेळी घेण्यात आला


## कारंजा चौक दुर्गा माता मंदिर नवरात्र उत्सवाला ५२ वर्ष पूर्ण!

जनसंचलन/बुलडाणा

शहरातील श्रद्धा व भक्तीचे केंद्रस्थान असलेल्या कारंजा चौक येथील दुर्गा माता मंदिराचा ऐतिहासिक नवरात्र उत्सव यावर्षी ५२ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. २२ सप्टेंबरपासून नवरात्र उत्सवाला सुरुवात झाली असुन दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील हा सोहळा भव्यदिव्य स्वरूपात साजरा होत आहे. नवरात्र महोत्सव काळात रोज सायंकाळी साडेसात वाजता महाआरतीचे आयोजन करण्यात येते. आरतीनंतर भक्तांना महाप्रसादाचे वाटप केले जाते. या उत्सवाला दररोज शेकडो भाविक उपस्थित राहून माता दुर्गेच्या चरणी आपली श्रद्धा अर्पण करतात. उत्सवाचे वैशिष्ट्य मंदिर समितीच्या पुढाकाराने गेल्या ५२ वर्षांपासून हा उत्सव सातत्याने आयोजित केला जात आहे. दररोज विविध धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तन, देवीची पूजा-अर्चा, महाआरती व प्रसाद यांचे आयोजन.



नवरात्र महोत्सवामुळे परिसरात भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरण. स्थानिक नागरिकांसाठी हा उत्सव केवळ धार्मिक कार्यक्रम नसून एकात्मता, भक्ती व सामाजिक सलोख्याचे प्रतीक बनला आहे. २२ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या या ५२व्या नवरात्र महोत्सवासाठी कारंजा चौकातील दुर्गा माता मंदिर परिसर सज्ज झाला असून भाविकांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या सर्व कार्यक्रमांमधे भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन मंदीर समितीने केले आहे.




# एलसीबीची धाड अकरा जुगारी पकडले! एक लाख ९१ हजाराचा मुद्देमाल जप्त!....

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी ठिकठिकाणी धाड टाकून अकरा जुगाऱ्यांवर गुन्हा दाखल करून एक लाख ९१ हजाराचा मुद्देमाल जप्तीची कारवाई केली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे,अपर पोलिस अधिक्षक अमोल गायकवाड यांच्या मार्ग दर्शनात व स्थागूशाचे सुनिल अंबूलकर यांच्या नेतृत्वात जुगाऱ्यां वर कारवाई करण्याचे आदेशित करण्यात आले होते.दरम्यान अमडापूर, शिवाजी नगर खामगाव पोलीस ठाणे हद्दीत कारवाई केली. यामध्ये पो.स्टे. अमडापूर हद्दीत बेलसरी शिवारात (उदयनगर) येथे पैशांचे हारजीतवर ५२ ताश पत्यावर जुगार खेळत असलेले आरोपी शेख शहीद शेख मेहबूब वय ३७ वर्षे रा. उदयनगर + ईतर 04 यांना पकडून, त्यांचे ताब्यातून नगदी रोख १८,५५० रुपये, १,४०,००० किंमतीच्या ३ मोटार सायकली व इतर जुगार साहित्य असा एकूण १,५८,६०० रुपयांचा जुगार साहीत्यासह मुद्देमाल हस्तगत केला. तसेच पो.स्टे.शिवाजी नगर- खामगांव हद्दीत रावण टेकडी परिसर येथे जुगार रेड करुन ५२ ताश पत्यावर जुगार खेळणारे आरोपी सुशील विजय इंगळे वय २९ वर्षे, रा. रावण टेकडी खामगांव इतर ५ यांना पकडून त्यांचे ताब्यातून नगदी रोख ४५६० रुपये, २८,००० रुपये किंमतीचे ३ मोबाईल इतर साहित्य असा एकूण ३२,६१० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.या केलेल्या कारवाईमध्ये एकूण ११ आरोपी विरुध्द म.जु.का. प्रमाणे कारवाई करुन त्यांचे ताब्यातून एकूण १,९१,२१० रुपयांचा जुगार मुद्देमाल हस्तगत केला आहे. सदरची हि कारवाई पोउपनि प्रताप बाजड, पंकज सपकाळे,पोहेकॉ. शरद गिरी, जगदेव



टेकाळे, एजाज खान, पोना. अनंता फरताळे, सुनिल मिसाळ, राकेश नायडू, अरविंद बडगे, पोकॉ. सतीश नाटेकर, अमोल शेजोळ, विक्रांत इंगळे, मपोकॉ, पूजा जाधव, चापोहेकॉ विकास देशमुख, चापोकॉ. शिवानंद हेलगे या पथकाने केली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वरवंड येथे भाजपाच्या वतीने राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवासप्ताह निमित्त रक्तदान शिबिर संपन्न

**जनसंचलन/बुलढाणा**

देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसापासून ते महात्मा गांधी यांच्या जयंती पर्यंत भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभर राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा सप्ताह राबविण्यात येत आहे. यानिमित्त विविध सेवा उपक्रम राबवून भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते गावोगावी आपल्या लाडक्या नेत्याला वाढदिवसाच्या सेवारुपी शुभेच्छा देत आहेत. या सेवा पंधरवाड्यात भाजपा कडून विविध ठिकाणी रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, मॅरेथॉन स्पर्धा, गोसेवा, सैनिक सन्मान, यासारखे अनेक सेवा उपक्रम राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून बुलढाणा ग्रामीण भारतीय जनता पार्टी तर्फे वरवंड येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी रक्तदात्यांनी रक्तदान करून आपल्या लाडक्या नेत्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सदर रक्तदान शिबिरात तालुका अध्यक्ष सतिश भाकरे पाटील, भाजपा नेते ॲड.दशरथसिंग राजपूत, माधवराव म्हस्के, दत्तात्रय जेऊघाले, सरचिटणीस सतीश देहाडराय, किसान मोर्चा तालुकाध्यक्ष अमोल पडोळ, उपाध्यक्ष गणेश जेऊघाले, सारंगधर एकडे, राजेश पाठक, कोषाध्यक्ष शरद एकडे, भाजयुमो तालुका सचिव सागर पाटील, भाजयुमो सोशल मीडिया प्रमुख कार्तिक राजपूत, गणेश जैन, रवींद्र जेऊघाले, अशोकराव जेऊघाले, धोंडू गिरी, विजय जेऊघाले, दीपक



पुरभे, गोविंद चाव्हरे, अशोक चाव्हरे, अंकुश पवार, भास्कर खेडेकर, प्रदीप जेऊघाले, निलेश पवार, अरुण चाटे, सुधीर तांगडे, छगन धंदर, भरत जेऊघाले, अमोल जेऊघाले, भागवत धंदर यांच्यासह परिसरातील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते, पदाधिकारी व गावकरी मंडळी उपस्थित होते. सदर रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी जीवनधारा ब्लड बँक बुलढाणा, प्राथमिक उप आरोग्य केंद्र वरवंड यांचे सहकार्य लाभले.

# २९ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात माहिती अधिकार दिन साजरा होणार

**जनसंचलन/बुलडाणा**

प्रत्येक वर्षी २८ सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी २८ सप्टेंबर हा दिवस रविवारी सुट्टीचा असल्याने, शासनाच्या निर्देशानुसार सोमवार, दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी माहिती अधिकार दिनफक्ष साजरा करण्यात येणार आहे. शासन निर्णय दि. २० सप्टेंबर २००८ नुसार माहिती अधिकार दिन साजरा करणे बंधनकारक आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे दरवर्षीप्रमाणे या वर्षीही कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुखांनी आपल्या कार्यालयात माहिती अधिकार दिन उत्साहात साजरा करावा, तसेच




या निमित्ताने सामान्य जनतेमध्ये माहिती अधिकार कायद्याबाबत जनजागृती होणे अपेक्षित असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्यानुसार यंदाचा माहिती अधिकार दिन सोमवार २९ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हात साजरा करण्यात येणार आहे, याची नोंद संबंधितांनी घ्यावी असे आवाहन प्रसिद्धीपत्रकांवर जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# फसव्या भरती संदेशापासून सावधान; आरोग्य विभागाचे नागरिकांना आवाहन

**जनसंचलन/ मेहकर**

मेहकर तालुक्यासह संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात आरोग्य विभागातील कनिष्ठ सहाय्यक व इतर पदांवर कंत्राटी पद्धतीने भरती केली जाणार आहे, अशा आशयाचे फसवे मेसेज व्हॉटॲप व सोशल मीडियावर वेगाने प्रसारित होत आहेत. बेरोजगार युवक-युवतींना लक्ष्य करून त्यांची फसवणूक करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे समोर आले असून अशा फसव्या संदेशावर विश्वास ठेवू नये व फसवणूकीला बळी पडू नये, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विजय बलकार(मेहकर) यांनी केले आहे. आरोग्य विभाग, जिल्हा परिषद बुलढाणा मार्फत कोणतीही भरती प्रक्रिया सध्या सुरू नाही. तसेच अशा प्रकारची अधिकृत जाहिरातही जारी केलेली नाही. त्यामुळे अशा फसव्या संदेशाला बळी पडू नका. आरोग्य विभागातील किंवा इतर सरकारी भरतीच्या जाहिराती फक्त अधिकृत संकेतस्थळावर किंवा वर्तमानपत्रांतच प्रसिद्ध केल्या जातात. संशयास्पद संदेश आढळल्यास तात्काळ संबंधित प्रशासनास कळवावे. बेरोजगार उमेदवारांची फसवणूक टाळण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे, असे आरोग्य विभागाने प्रसिद्धी पत्रकाव्दारे स्पष्ट केले आहे.




# नैसर्गिक आपत्तीबाधित शेतकऱ्यांसाठी १२१ कोटींच्या मदत निधीस मंजूरी

## आतापर्यंत २१९ कोटी ७० लाख रुपयांची मदत

## पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांची माहिती

**जनसंचलन/ बुलढाणा**

जिल्ह्यात जून ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पूर यामुळे बाधित झालेल्या १ लाख ८० हजार ३६८ शेतकऱ्यांना शेतपिकांच्या नुकसानीपोटी १२१ कोटी ८९ लाख ४३ हजार रुपये इतका निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात आली असून त्याबाबतचा शासन निर्णय २३ सप्टेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आला आहे. तसेच आतापर्यंत नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानीपोटी जिल्ह्यातील बाधितांना २१९ कोटी ७० लाख ८२ हजार रुपये इतका मदत निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद जाधव पाटील यांनी दिली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांप्रती शासन संवेदनशील असून अतिवृष्टी व पूर या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीपोटी बाधित शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी राज्य शासनाने वेळोवेळी मदत निधीला मान्यता दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती याप्रमाणे. यापुर्वी २२ जुलै २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार अवेळी पाऊसामुळे बाधित १४ हजार ९०९ शेतकऱ्यांना १५ कोटी ५५ लाख ५० हजार रुपये इतका मदत निधीस मान्यता दिली आहे. तसेच ६ ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार अतिवृष्टीमुळे बाधित ९० हजार ३८३ शेतकऱ्यांना ७४ कोटी ४५ लाख ३ हजार रुपये इतका निधी तर १७ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार अतिवृष्टीमुळे बाधित ८ हजार ३९७ शेतकऱ्यांना ७ कोटी ८० लाख ८६ हजार रुपये इतका निधी वितरीत करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच आज दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार जून ते ऑगस्ट २०२५ या कालावधीतील जिल्ह्यातील अतिवृष्टी व पूरामुळे बाधित १ लाख ८० हजार ३६८ शेतकऱ्यांना १२१ कोटी ८९ लाख ४३ हजार रुपये निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.



नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांप्रती शासन संवेदनशील असून सद्या बुलढाणा जिल्ह्यातील विविध भागात अतिवृष्टी झाल्याचे निदर्शनास आले असून या नुकसानग्रस्त भागातील बाधित शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी पिकांचे तत्काळ पंचनामे करुन मदतीचा प्रस्ताव शासनस्तरावर पाठवावा, असे निर्देश प्रशासनाला दिले. तसेच यापूर्वी झालेल्या अवेळी पाऊस, अतिवृष्टी, पूर या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या नुकसानग्रस्त शेतपिकांचे तातडीने पंचनामे केल्याने बाधित शेतकऱ्यास दिलासा मिळाले आहे, अशी भावना मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद जाधव पाटील यांनी व्यक्त केली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रिपाई (अ) जिल्हाध्यक्ष निवड बैठकीत दोन गटांत जोरदार झाला राडा..

जनसंचलन/बुलढाणा

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) च्या बुलढाणा जिल्हाध्यक्ष निवडीसाठी मंगळवारी (दि. २३ सप्टेंबर) दुपारी तीन वाजता बुलढाणा येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित बैठकीदरम्यान दोन गटांत वाद झाला. पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत हातघाईपर्यंत गेलेला वाद अखेर पोलिसांच्या हस्तक्षेपाने निवळला. पक्षाने जिल्हाध्यक्ष निवडीसाठी ही बैठक बोलावली होती. निरीक्षक म्हणून छत्रपती संभाजीनगर येथून बाबुराव कदम आणि सुधाकर तायडे यांची नियुक्ती करण्यात आली होती. जिल्हाध्यक्षपदासाठी शरद खरात, विजय मोरे, पठाण, राजू साबळे, सतीश बोर्डे, संजय वाकोडे यांच्यासह काही इच्छुकांचे नावे चर्चेत होती. सुरुवातीला निरीक्षकांसमोर बाजू मांडताना दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला आणि खुर्चाही फेकल्या



# अपार्टमेंटच्या बेकायदेशीर बांधकामाला क्लिन चीट देणाऱ्या सरपंच- सचिवांवर कलम ४२० सह इतर कलम नुसार गुन्हे दाखल!

जनसंचलन/बुलढाणा



भ्रष्टाचाराच्या दलदलीत रुतलेल्या ग्रामपंचायत प्रशासनाचा बुरखा फाडणारी एक खळबळजनक घटना बुलढाण्यात उघडकीस आली आहे. नियम आणि कायद्याला पायदळी तुडवून एका आलिशान अपार्टमेंटच्या बेकायदेशीर बांधकामाला ओके म्हणणाऱ्या तत्कालीन सरपंच उषा खैवान आणि सचिव माणिक शेळके यांच्यावर आता थेट कायदेशीर कारवाईचे आदेश धडकले आहेत. सन २०१० ते २०१५ या कालावधीमध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत बांधकाम नियमांची उघडपणे पायमल्ली करून, ही नियमबाह्य परवानगी देण्यात आल्याचे चौकशीत समोर आले आहे. नमूद अटी आणि शर्तींचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर, या प्रकरणातील गैरव्यवहार स्पष्ट झाला आहे. त्यामुळेच पोलिसांनी तत्कालीन सरपंच उषा खैवान आणि ग्रामसेवक माणिक शेळके या दोघांवर थेट कलम ४२०,४६७, ४६८,४७१ (३४) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बुलडाणा तालुक्यातील सर्वात मोठी येळगाव,सावळा सुंदरखेड, माळविहिर व सागवन ग्रामपंचायतीत सरपंचासह सचिवाने केलेले भ्रष्टाचार व नियमबाह्य कामांची पोलखोल देखील होणार असल्याच्या हालचाली दिसून येत आहे

# महाराष्ट्र ते राजस्थान मार्ग काढत २ खंडणीखोरांना ठोकल्या बेड्या!

## पिस्टल,काडतूस सह साडेपाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत! एलसीबीची दमदार कामगिरी!

जनसंचलन/ बुलढाणा

क्रुड ऑईलची कंपनीच्या दोघा सेल्स मॅनचे अपहरण करून वीस लाखाची खंडणी मागणाऱ्या दोन खंडणीखोरांना बुलढाणा एलसीबीच्या पथकाने राजस्थान कोठा येथून जेरबंद केले आहे. मो. जुनेद मोहम्मद इमरान वय ३० वर्षे, रा. अमरावती व निहाल अहमद फिरोज अहमद वय २६ वर्षे रा. अमरावती अशी आरोपींची नावे आहेत.आरोपीं कडून पिस्टल,काडतूस सह साडेपाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. घटनेची हकीकत अशी आहे की, २२ सप्टेंबर रोजी फिर्यादी जयदीप नक्कु गिडा रा. अडाजन जि. सुरत (गुजरात) यांनी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांनी तक्रारीत म्हटले की त्यांची क्रुड ऑईलची कंपनी आहे. महाराष्ट्रामध्ये कंपनीच्या आईलचे डिस्ट्रीब्युटर व सेल करीता जयेश ऊर्फ जिराग व हिम्मतभाई हे मलकापूर शहरात राहत होते. दरम्यान ते १९ सप्टेंबर रोजी फिर्यादी जयदीप नक्कु गिडा यांना आढळून आले नाहीत.त्यामूळे त्यांनी मिसींग तक्रार दाखल केली. दरम्यान २२ सप्टेंबर रोजी आरोपींनी फिर्यादी गिडा यांना कॉल करुन त्यांच्या कंपनीचे जयेश ऊर्फ जिराग दत्ताणी व हिम्मतभाई पांडीया रा. गुजरात हे आमच्या ताब्यात असून, त्यांना सोडण्यासाठी २० लाखाची खंडणी मागितली. खंडणी न दिल्यास किंवा पोलीसांना माहिती दिल्यास अपहरण केलेल्या व्यक्तींना जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी गुन्हा दाखल होऊन जिल्हा पोलिस अधिक्षक निलेश तांबे व स्थागुशाचे पोनि सुनिल अंबूलकर यांच्या अधिनस्त अधिकारी व अंमलदार यांचे स्वतंत्र पथक तयार करण्यात आले. तांत्रीक माहितीच्या आधारे गुन्ह्यातील आरोपी हे त्यांचा सतत ठावठिकाणा बदलत असल्याचे दिसन आले. त्यामुळे सदर आरोपींना पकडण्यासाठी त्यांचा पाठलाग करणे गरजचे झाले. पथकाने विश्रांती न घेता सतत ४८ तासात १६०० कि.मी. प्रवास करत, यातील आरोपींचा मलकापूर, अकोला, अमरावती, चांदूर रेल्वे, परतवाडा, बैतुल, भोपाळ (मध्यप्रदेश), नागट, कोटा (राजस्थान) असा पाठलाग केला. असा पाठलाग सुरु असतांना पो.स्टे. रेल्वे कॉलोनी-कोटा (राजस्थान) यांचे मदतीने आरोपींना नॉर्दन चौफुल्ली कोटा येथे



मोठ्या शिताफीने व धाडसाने पकडून त्यांच्या ताब्यातून अपहरण झालेले दोन्ही ईसम यांची सुखरुप सुटका केली.

यांनी केली कामगिरी...

जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या आदेशान्वये श अपर पो.अधिक्षक अमोल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि सुनिल अंबुलकर यांचे नेतृत्वात पोउपनि अविनाश जायभाये, पोहेकॉ. शेख चाँद, गणेश पुरुषोत्तम पाटील, पोकॉ. गजानन गोरले नेमणूक स्था. गु.शा. बुलढाणा, ग्रे. पोउपनि सुरेश रोकडे, पोकॉ. संतोष पेंढारकर, ईश्वर वाघ, सुरज चौधरी पो.स्टे. मलकापूर शहर, पोहेकॉ.राजू आडवे, पोकॉ. कैलास ठोंबरे, पवन मखमले, ऋषीकेश खंडेराव यांनी केली

# बुलढाण्यात मयुरीच्या न्यायासाठी आक्रोश!




जनसंचलन/बुलढाणा

मयुरी गौरव ठोसर प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करण्याच्या न्यायीक मागणीसाठी आज बुलढाणा शहर नागरिक समन्वय समितीने आक्रोश मार्चा काढला. संगम चौकातील शिवस्मारक येथून काढण्यात आलेला हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकून जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. बुलढाण्याच्या मयुरी बुडुकले हिचा १० मे रोजी जळगाव खान्देश येथील गौरव ठोसर याच्याशी विवाह झाला होता. मात्र लग्नाच्या चार महिन्यानंतरच मयुरीचा मृत्यू झाला, तिने आत्महत्या केल्याचे सासरकडच्या लोकांकडून दाखवण्याचा प्रयत्न झालाय.. मात्र ही आत्महत्या नसून ती हत्या असल्याच्या भावना माहेर कडील नातेवाईकांनी व्यक्त केल्या आहेत. मयुरीच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे या मागणीसाठी आज बुलढाणेकरांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये सर्व राजकीय पक्षीय व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी त्याचबरोबर महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८